नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 22/04/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## दुखापत

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि. मी अंतरावर वार्ड क्र. 3 सिल्लेवाडा येथे दिनांक 21/04/2021 चे 13:00 वा. ते 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमित कन्हैयालाल यादव वय 26 वर्ष, रा वार्ड क्र 03 लाल चौक सिल्लेवाडा हा आपल्या घरी झोपला असतांना आरोपी 1) प्रतीक चौरे, रा. वार्ड क्र 05 सिल्लेवाडा व 2) तिन अनोळखी इसम रा. सिल्लेवाडा यांनी त्यास आवाज दिले त्यामुळे फिर्यादी हा घराच्या बाहेर गेला असता आरोपीतांनी फियादीला अश्लिल शिवीगाळ करीत "तेरा भाई रोहीत कहॉ है" असे विचारणा करून फिर्यादीचे डोक्यावर लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच फिर्यादीचा भाउ रोहीत यास आरोपीतांनी संगनमत करून जुने वादाचे कारणावरून चाकुने पोटावर मारून जखमी केले. फिर्यादीचे भावास पी एच सी चिचोली येथे उपचाराकामी नेले असता रेफर केल्याने पुढिल उपचार मेयो हॉस्पीटल नागपुर येथे सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 324, 294, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री निमगडे मो. नं. 8999917112 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 18 कि. मी अंतरावर चोरखैरी येथे दिनांक 21/04/2021 चे 09:00 वा. ते 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. तुळजा राजविलास कुंभरे, वय 42 वर्ष, रा. चोरखैरी व आरोपी नामे– विजय शंकर कुंभरे, रा. चोरखैरी हे दोघेही भाजीपाल्याचा दुकान लावुन भाजीपाला विकत असतात. आरोपी व त्याचे मित्र आपसात बोलत असतांना फिर्यादीला वाटले की, "माझ्या बद्दल काहीतरी बोलत आहे" व शिवीगाळ करण्याचा आवाज आल्याने फिर्यादीने विचारले "मला शिवीगाळ का करता"? यावरुन तोंडा तांडी वाद करुन फिर्यादीचे डोक्याचे मागील बाजुला व कपाळाला वजनाच्या गोटयाने आरोपीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 325, 323, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते मो क्र 9823612858 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. रामटेक – दिनांक 21/04/2021 चे 11.00 वा. ते 12.30 वा.चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्यीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला आरोपी नामे– रोशन धुर्वे, वय 18 वर्ष, रा. बोरी याने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री बेन्द्रे 9822973154 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि. मी. गार्डन चौक येथे दिनांक 20/04/2021 चे 22:15 वा. ते 22.30 वा. दरम्यान मृतक नामे 1) गफार इसाक शेख वय 50 रा. बुटीबोरी व 2) केशव नारायण कातुरे वय 50 वर्ष रा. बुटीबोरी आणि जखमी नामे– देवराव खंडाते हे तिघेही एमएच–40/के– 9564 क्रमांकाच्या मोटरसायकलवर ट्रिप्पल सीट बसवुन इंडोरामा ते बुटीबोरी येथे जात होते. त्यादरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वरील मोटरसायकला धडक दिली. या अपघातात 1) गफार इसाक शेख वय 50 रा. बुटीबोरी याचा जागीच मृत्यु झाला व केशव नारायण कातुरे वय 50 वर्ष रा. बुटीबोरी याला उपचाराकरीता नेत असतांना मरण पावला. तसेच देवराव खंडाते वय 52 वर्ष हा गंभीर जखमी असुन उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तौसिफ उर्फ गोलू बाबूलशाह शेख, वय 29 वर्ष, रा. बुटीबोरी वार्ड नं. 1 जुनी वस्ती त.हिंगणा जि.नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दिप पांडे मो.क्र 8888838995 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर